# नि वि दा सु च ना

अलिबाग येथील मा. प्रुमख जिल्हा न्यायाधीश, रायगड—अलिबाग यांचेकरिता असलेले शासकीय वाहन (Hyundai Accent GLE Exec imm, E III) क्र.एम.एच.०६/एए /४५९ हे दि. ०५.०८.२०१९ रोजी निर्लेखित करण्यात आले आहे. सदरहु वाहन जास्त किंमत देवून खरेदी करु इच्छिणाऱ्या लोकांकडून मोहोरबंद किंमतीच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

उक्त वाहन हे मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड—अलिबाग यांचे न्यायालयाच्या आवारात पहाण्यासाठी उपलब्ध ठेवण्यात आले आहे. ते कार्यालयीन वेळेत इच्छुक लोकांना पाहता येईल. ज्या कोणा इच्छुक व्यक्तीस सदरहु वाहन खरेदी करणेचे असेल त्यांनी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड—अलिबाग यांच्या नांवाने मोहोरबंद किंमतीच्या निविदा दि.१७.०८.२०२० रोजी सकाळी ११—०० वाजेपर्यंत मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड—अलिबाग यांचे कार्यालयात पोहोचतील अशा बेताने सादर कराव्यात. दि. १७.०८.२०२० रोजी सकाळी ११—०० वाजेपर्यंत प्राप्त न झालेल्या निविदा किंवा अपुर्ण असलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. अनामत रक्कम म्हणून रु.५,०००/—(अक्षरी पाच हजार मात्र) या रक्कमेचा अलिबाग येथील 'स्टेट बॅक ऑफ इंडिया' या बॅकेचा डिमान्ड ड्राफ्ट 'प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड—अलिबाग' यांचे नावाने काढून निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

लखोटा मोहोरबंद केलेला असावा व त्यावर **''वाहन क्र. एम.एच.०६/एए /४५९ साठी निविदा''** असे ठळक अक्षरात लिहीलेले असावे. निविदा दि. १८.०८.२०२० रोजी सकाळी ११—०० वाजता प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड—अलिबाग यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील.

निविदा स्विकारल्याचे कळविल्यानंतर तीन दिवसांत पुर्ण रक्कम भरुन वाहन घेवून जावे लागेल. तसे न केल्यास भरलेली रक्कम शासनाकडे जमा होईल व परत दिली जाणार नाही.

ज्यांचे नांवे निविदा मंजूर करण्यात आली असेल त्यांनी संपुर्ण रक्कम जमा करुन वाहन न नेल्यास पुन्हा निविदा मागवून वाहनाची विल्हेवाट लावण्यात येईल.

कोणतेही कारण न दाखविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्विकारणेचा किंवा फेटाळण्याचा अधिकार प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड—अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. याबाबतीत कोणतीही तक्रार करता येणार नाही.

(विभा प्र. इंगळे)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,रायगड—अलिबाग.

admin/vehical condemn

जा.क्र.प्रशा/३५४७ सन २०२०
जिल्हा न्यायालय, रायगड—अलिबाग
दिनांक :— ०४/०८/२०२०

प्रत:— कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्दी साठी.

१. जिल्हाधिकारी, रायगड—अलिबाग
२. तहसिलदार, अलिबाग
३. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग
४. उपविभागिय अधिकारी, उपविभाग अलिबाग/पनवेल/महाड/माणगांव
५. जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करणेसाठी.
६. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, रायगड—अलिबाग याजकडे कृपया सदरची निविदा स्थानिक वृत्तपत्रातुन विनामुल्य प्रसिध्द होण्यासाठी रवाना

जिल्हा न्यायालय, रायगड, }
अलिबाग, दि. ०४.०८.२०२० }

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, रायगड—अलिबाग

admin/vehical condemn